नि. दि. दावा क्र. ४६/२००८

नि. ३०७

## प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची साक्ष

## शपथेवर सरतपासणी वादीपक्षातर्फे – श्री. एस.व्ही. लाळे विद्यमान वकील यांच्यामार्फत

शपथेवर सत्य कथन करतो की, माझे संपूर्ण नाव विलास भगवान शिंदे, वय–६० वर्षे, धंदा– शेती, राहणार – चिंचाळे, ता. आटपाडी, जि. सांगली असुन माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर मी सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेकामी मी त्यावर माझी सही आहे.

०१. आता मला दिनांक १९/०२/१९९६ रोजीचे अब्दुल हसन संदे यांनी मोहन धोंडीराम जगदाळे यांच्या हक्कात करुन दिलेले मुळ खरेदीपत्र निशाणी ३०६ चा दस्त दाखविण्यात आला. त्यावर ओळख देणार म्हणून माझी सही आहे. त्यावर अब्दुल हसन संदे आणि साक्षीदारांनी सह्या केलेल्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे.

## वादीतर्फे उलटतपास विद्यमान वकील श्री. आर.ए. उथळे यांच्यामार्फत सुरु –

०२. या दाव्यामध्ये मोहन जगदाळे यांनी म्हणणे दाखल केले होते, ते मी वाचले आहे. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात मोहन जगदाळे यांचा मुलगा शाहिद यांचा जबाब झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शाहिद याचा जबाब वाचला आहे.

०३. दाव्यातील मिळकत काय आहे आणि त्यामधील बांधकाम कशी–

कशी आहेत याबाबत मला माहिती आहे. मला दाव्यातील घरमिळकतीचा नंबर माहिती नाही. मी निशाणी ३०६ वरील दस्त वाचलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३०६ मध्ये ग्रामपंचायत घर क्रमांक लिहलेला नाही. हे मला माहिती नाही की, १९९६ साली वादग्रस्त घरमिळकतीला ग्रामपंचायत घर क्रमांक दिला होता किंवा कसे. हे मला माहिती नाही की, या दाव्यामध्ये मोहन जगदाळे आणि शाहिद जगदाळे यांनी या मिळकतीबाबत काय कागद दाखल केली आहेत. मी १९९६ पूर्वी आणि १९९६ नंतर वादग्रस्त घर मिळकतीमध्ये जाऊन वस्तुस्थिती पाहिली आहे. त्याची मोजमापे मी घेतलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त घर मिळकतीचे मोजमापे करण्यासाठी मी ग्रामपंचायतचा अभिलेख पाहिलेला नाही. हे मला माहिती नाही की, या दाव्यामध्ये दस्तगीर संदे यांनी वाद मिळकतींची काय वर्णन आणि मोजमापे दिली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीला येण्यापूर्वी दस्तीगीर संदे यांनी काय दावा केला आहे, हे मी वाचलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यामध्ये अ,ब,क,ड या परिच्छेदांमध्ये मिळकतीचे वर्णन नमुद केलेले आहे. परिच्छेद क्र. अ,ब,क,ड मध्ये नमुद केलेले मिळकतीची वर्णन व मोजमापे याची वस्तुस्थिती मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने मोहन जगदाळे विरुद्ध ताकीद अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जाचा निकाल दस्तगीर संदे सारखा झाला. हे म्हणणे खरे नाही की, ताकीद अर्जाचा निकाल काय झाला याबाबतची माहिती मी मोहन जगदाळे यांच्याकडून घेतली नाही. माझ्या माहितीप्रमाणे ताकीद दस्तगीर संदे यांना दिली नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यासोबत दाखल केलेला हातनकाशा मी

पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशामध्ये 'जे' या अक्षराने मिळकत दाखविलेली आहे. हे मला माहिती नाही की, 'जे' अक्षरामध्ये काय काय मोजमापे लिहलेली आहेत. सदर नकाशामध्ये 'जे' अक्षर सोडून इतर नमुद केलेली मोजमापे मी पाहिलेली आहेत. हे मला माहिती नाही की, 'जे' अक्षर सोडून उर्वरित मिळकतीबद्धल दस्तगीर संदे यांनी दाव्यामध्ये काय मागणी केली आहे. 'जे' अक्षर सोडून राहिलेल्या मिळकतीची मोजमापे मला माहिती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, 'जे' अक्षर सोडून राहिलेली मिळकत ही १/३ हिश्याची आहे.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, सदर नकाशामध्ये 'जे' अक्षराने दर्शविलेल्या मिळकतीमध्ये दस्तगीर संदे यांचे राहते घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, 'जे' अक्षराने दर्शविलेल्या जागेमध्ये दक्षिण दिशेला उत्तराभिमूख बांधकाम आहे. हे म्हणणे खरे आहे की, 'जे' अक्षराने दर्शविलेल्या क्षेत्रामध्ये पश्चिम बाजूला उत्तराभिमुख बांधकाम आहे. हे म्हणणे खरे नाही की, 'जे' अक्षराने दर्शविलेल्या क्षेत्राची उत्तर–दक्षिण लांबी पन्नास फुट आहे. हे म्हणणे खरे नाही की, 'जे' अक्षराने दर्शविलेल्या क्षेत्रामध्ये पश्चिम दिशेला असलेल्या उत्तराभिमूख बांधकामाची दक्षिण– उत्तर लांबी चाळी फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, 'जे' अक्षराने दर्शविलेल्या क्षेत्रामधील पश्चिमेकडील उत्तराभिमूख बांधकामाच्या दक्षिण दिशेला उत्तराभिमूख राहते घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दक्षिण दिशेला असलेल्या उत्तराभिमूख घराच्या उत्तरेकडील समोर असलेल्या बांधकामाची उत्तर–दक्षिण लांबी चाळीस फुट आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३०६ मध्ये मिळकतीची लांबी चाळीस फुट एवढीच नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे नं. ५८५ ची संपूर्ण पुर्व–पश्चिम रुंदी अठरा फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या पुर्वेस सय्यद नावाच्या व्यक्तीचा सिटी सर्वे क्र. ५८४ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८४ ची पश्चिमेकडील हद्द ही उत्तरेकडून रस्त्यापासून दक्षिणेपर्यंत एक भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८४ च्या पश्चिमेकडील उत्तर–दक्षिण भिंतीपासून सिटी सर्वे क्र. ५८५ मधील मिळकतीमधील पश्चिमेकडील उत्तराभिमूख बांधकामाची पुर्वेकडील भिंत यामधील अंतर वीस फुट आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९६ चे खरेदीपत्र हे सिटी सर्वे क्र. ५८४ च्या पश्चिमेकडील हद्दीपर्यंत नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र ५८५ मधील दक्षिणेकडील उत्तराभिमूख घराची पुर्व–पश्चिम लांबी वीस फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८४ ची पश्चिमेकडील भिंत आणि सिटी सर्वे क्र. ५८५ मधील दक्षिणे दिशेला असलेलया घराची पुर्वेकडील भिंत या एकमेकांना चिकटून आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ मधील लोकांना पुर्वेकडे सिटी सर्वे क्र. ५८४ मध्ये जाता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ आणि सिटी सर्वे क्र. ५८४ मध्ये असलेल्या दक्षिण–उत्तर भिंतीला चौकट वगैरे नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ मधील दक्षिण दिशेस असलेल्या घराला पाठभिंत आहे, त्याला चौकट नाही.हे म्हणणे खरे आहे कि, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या उत्तरेस पुर्व –पश्चिम रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ मधील दक्षिणेस असलेल्या घरामध्ये वादी दस्तगीर संदे

राहतात. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ मधील दक्षिण बाजुच्या घरातून सिटी सर्वे क्र. ५८५ च्या उत्तरेस असलेल्या रस्तयावर जायचे झाल्यास, उत्तर दिशेस असलेल्या खुल्या जागेमधून जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या उत्तरेस असलेल्या खुल्या जागेमध्ये वादी दस्तगीर संदे यांचे संडास, बाथरुम व किचन आहे.

०८. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ मध्ये पश्चिम दिशेस असलेल्या बांधकामाला उत्तर दिशेला एक फळ्याचा दरवाजा दावा दाखल केला त्यावेळी होता. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ मध्ये असलेल्या बांधकामाच्या उत्तरेस असलेला फळयांचा दरवाजा हा उत्तरेकडील असलेल्या रस्त्याच्या हद्दीपर्यंत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की सिटी सर्वे ५८५ मधील पश्चिमेकडील असलेल्या बांधकामाला पश्चिम दिशेला उत्तर– दक्षिण भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याचप्रमाणे सदर बांधकामाला पुर्व दिशेस उत्तर–दक्षिण भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र ५८५ च्या पश्चिमेस असलेल्या बांधकामध्ये उत्तराभिमूख असलेल्या फळयांच्या दरवाजाचे पूर्व टोक आणि त्या बांधकाममधील पुर्वेस असेलेली उत्तर दक्षिण भिंत एका रेषेत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फळयांचा दरवाजा संपल्यानंतर पुर्व दिशेस सिटी सर्वे क्र. ५८५ मधील खुली जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फळयांचा दरवाजा संपल्यानंतर सिटी सर्वे क्र ५८५ मधील निम्म्या क्षेत्रामध्ये खुली जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, फळयांचा दरवाजा पुर्व–पश्चिम आठ फुट आहे. हे म्हणणे खरे नाही की, फळयांचा दरवाजापासून सिटी सर्व क्र. ५८४ ची हद्द यामधील उत्तर दिशेचे अंतर नऊ फुट आहे.

**०९.** हे म्हणणे खरे नाही की, फळयांचा दरवाजा संपल्यानंतर सिटी सर्वे क्र. ५८५ मध्ये पाकीजा चिकन सेंटर हे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, फळयांचा दरवाजा संपल्यानंतर पुर्वेस शेडनेटचे व पत्राचे शेड आहे. हे म्हणणे खरे आहे की, फळयांच्या दरवाजाचे पुर्व टोक आणि सिटी सर्वे क्र. ५८४ मधील पश्चिमेची हद्द यामध्ये असलेलया जागेत उत्तरेकडील रस्त्यालगत कोणतीही चौकट नाही. हे म्हणणे खरे नाही की, फळयांच्या दरवाजाचे पुर्व टोक आणि सिटी सर्वे क्र. ५८४ मधील पश्चिमेची हद्द यामध्ये असलेल्या जागेत कोणतीही पुर्व–पश्चिम भिंत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फळयांच्या दरवाजाच्या पुर्व टोकापासून सिटी सर्वे क्र. ५८४ च्या हद्दीपर्यंत उत्तरेकडील बाजू कोणत्याही भिंतीने बंदीस्त केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सि.स. क्र. ५८५ च्या पुर्व बाजूला उत्तर–दक्षिण पाच फुट उंचीची अर्धवट बांधकामाची भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सि.स क्र. ५८५ च्या दक्षिणेस असलेल्या उत्तराभिमूख घराच्या पुर्व भिंतीपासून वीस फुट अंतरापर्यंत सिटी सर्वे क. ५८५ मध्ये कोणतीही भिंत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र ५८४ च्या पश्चिमेस सिटी सर्वे क्र. ५८५ मधील उत्तर–दक्षिण कोणतीही भिंत नाही. (खुलया जागेत) हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८४ च्या पश्चिमेस असलेल्या भिंतीपासून दहा फुट अंतरापर्यंत सिटी सर्वे क्र. ५८५ मध्ये कोणतीही अर्धी भिंत आहे.

**१०.** मोहन जगदाळे हे माझ्या आईचे मावस भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मोहन जगदाळे यांचे गाव चिंचाळे आहे आणि माझे गाव देखील चिंचाळे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोहन जगदाळे यांनी चिंचाळेमध्ये आर.सी.सी. घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, चिंचाळे येथे माझे घर आणि शेती आहे. हे

म्हणणे खरे आहे की, मला एकूण तीन भाऊ आहेत त्यापैकी दोघे मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दिलीप हा माझा सख्खा मोठा भाउ आहे. दिलीप सध्या हयात नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ मधील जागा पूर्वी अय्यर या व्यक्तीची होती. हे म्हणणे खरे आहे की, अय्यर याने त्याच्या जागेमध्ये बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, अय्यर यांचे बांधकाम आणि सिटी सर्वे क्र. ५८५ मधील अब्दुल संदे यांच्या घराचे बांधकाम एकाचवेळी झाले होते.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, अय्यर याला मिळालेला सिटी सर्वे क्रमांक हा त्याला सरकारकडून मिळालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या पुर्वेस सय्यद याच्या सिटी सर्वे मध्ये बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८४ हा सय्यद याला सरकारकडून रिकामा प्लॉट मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८४ च्या पुर्वेस शेख यांची मिळकत आहे अणि शेख यांच्या मिळकतीच्या पुर्वेस रस्ता आहे. हे मला सांगता येणार नाही की, सिटी सर्वे क्र. ५८४ मधील दक्षिणेकडील भिंत आणि सिटी सर्वे क्र. ५८५ मधील अब्दुल संदे यांच्या दक्षिणेकडील घराची पाठभिंत हे एका सरळ रेषेत आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, शेख यांच्या पश्चिमेस असलेले सय्यद आणि त्याच्या पश्चिमेस असलेले सिटी सर्वे क्र. ५८५ यांच्या दक्षिणेस इंदुबाई भांदीलगे यांची मिळकत आहे. त्यापैकी त्या मिळकतीवर काही क्षेत्रात बांधकाम आहे व काही क्षेत्र खुली जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या पश्चिमेस असलेल्या अय्यर यांच्या सिटी सर्वेच्या दक्षिणेपर्यंत इंदुबाई भांदीलगे यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, भांदीलगे आणि अय्यर यांच्या पश्चिमेस रस्ता आहे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, अय्यर यांची जागा माझ्या भावाने बांधीव घरासह खरेदी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अय्यर यांच्या जागेमध्ये बांधकामाची नोंद ग्रामपंचायतला अय्यरच्या नावाने माझ्या भावाने खरेदी घेतली त्याच्या पुर्वी होती. शेख, सय्यद, अब्दुल संदे आणि भांदीलगे यांच्या बांधकामाची नोंद खरसुंडी ग्रामपंचायत दप्तरी असावी. हे म्हणणे खरे नाही की, १९९६ च्या खरेदीपत्राच्यावेळी ग्रामपंचायत दप्तरी वादग्रस्त मिळकतीची नोंद मी आणि जगदाळे यांनी पाहिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ च्या खरेदीपत्रापूर्वी ग्रामपंचायत दप्तरी १९९६ च्या खरेदीपत्रातील मिळकतीतील नोंद आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे होते. जर आम्ही अभिलेख पाहिला असता तर ग्रामपंचायत दप्तरी अब्दुल यांच्या नावाची नोंद आहे असे समजले असते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत दप्तरी अब्दुल संदे यांच्या नावाची नोंद होती. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतचा उतारा न काढता १९९६ चे खरेदीपत्र झाले. साक्षीदार सांगतात की, सिटी सर्वेचा उतारा होता. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत दप्तरी अब्दुल संदे यांच्या नावे असलेल्या नोंदीवर 'परवानगीशिवाय विकता येणार नाही' असा शेरा होता. हे मला माहिती नाही की, अब्दुल संदे यांची मिळकत नविन गावठाणमधील आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, अय्यर, शेख, सय्यद आणि भांदीलगे यांच्या मिळकती नविन गावठाणामधील आहेत किंवा कसे.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, अब्दुल संदे यांची मिळकत संपादीत होती हा माझ्या शपथपत्रातील मजकूर बरोबर आहे. हे मला माहिती नाही की, अब्दुल संदे याने ही मिळकत नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी घेतली नव्हती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३०६ मधील खरेदीपत्रात ही मिळकत अब्दुल संदे

यांची संपादीत मिळकत आहे असे लिहले आहे. सदर मिळकत कशी संपादीत केलेली आहे, हे चौकशीअंती समजले असते. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत कशी संपादन केली आहे याची माहिती न घेता निशाणी ३०६ चा दस्त झाला आहे. हे मला माहिती नाही की, अब्दुल संदे याने बांधकाम करण्यापूर्वी तो मोकळा प्लॉट होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ चे प्रॉपर्टी कार्ड, नोंदवहीचा उतारा आणि नकाशा मी पाहिलेला नाही.

**१४.** खरसुंडी गावामधील सिटी सर्वे सन १९८५ मध्ये झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ ला अब्दुल संदे यांचे नाव कसे लागले याची चौकशी आम्ही केली नव्हती. आम्ही चौकशी केली म्हणजे, आम्ही रेकॉर्ड पाहिले म्हणजेच चौकशी नोंदवहीचा उतारा आणि नकाशा पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, चौकशी नोंदवहिचा उतारा पाहिल्यानंतर आम्हाला असे समजले की, ती मिळकत सरकारकडून अब्दुल संदे यांना मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पाहिलेल्या सिटी सर्वे नकाशामध्ये सिटी सर्वे क्र. ५८५ खुली जागा दर्शविलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, अब्दुल संदे यांना रहायला घर नाही म्हणून सरकारने त्यांना ती जागा दिली होती असे आम्हाला चौकशीअंती अभिलेख पाहिले असता समजले. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला अभिलेख पाहिल्यानंतर कळाले की, ती जागा अब्दुल संदे यांना मिळालेली होती. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेख पाहिल्यानंतर ही मिळकत अब्दुल संदे यांना खरेदीने आली नव्हती हे आम्हाला समजले होते. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेख पाहिल्यानंतर संदे यांना ही जागा कशी आली हे आम्हाला समजले नाही. अभिलेख पाहून संदे यांना मिळकत कशी आली होती, हे आम्हाला समजले

नव्हते.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या चौकशी नोंदवहीमध्ये काय लिहले आहे हे मला आता आठवत नाही. हे मला माहिती नाही की, ग्रामपंचायत रेकॉर्डला संदे यांची नोंद कशी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतला संदे यांच्या नावाची नोंद कशी झाली हे न पाहता १९९६ चा दस्त झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे क्र. ५८५ मध्ये बांधीव जागेला अब्दुल संदे यांच्या नावाने नळ कनेक्शन होते. हे मला माहिती नाही की, अब्दुल संदे यांच्या नावे फोन कनेक्शन होते किंवा कसे.

**प्रश्न –** मोजमापे चुकीची म्हणजे काय ?

**उत्तर –** मुळ खरेदीपत्र हे १५ x ४० फुट म्हणजेच ५५.७० स्क्वे. मिटर एवढया क्षेत्राचे झाले आहे. सदर मिळकतीच्या दक्षिण बाजुला ४.३४ स्क्वे. मी. एवढया क्षेत्राचे राहते घर आहे आणि सिटी सर्वे क्र. ५८५ च्या पुर्व बाजुला ५ फुट रुंदीचा रस्त्यावरुन दक्षिणेकडील राहणा–या लोकांना येण्या–जाण्यासठी आम्ही मालक म्हणून सवलत दिलेली आहे. सिटी सर्वे क्र. ५८५ च्या उत्तरेस असलेल्या रस्त्यापासून मिळकतीत येण्यासाठी सर्वांसाठी दरवाजे येण्याजाण्यासाठी ठेवलेले आहेत.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ च्या पश्चिमेकडील बांधकामाला चिकडून पुर्व दिशेला बांधकाम आहे. हे म्हणणे खरे आहे की, दस्तामध्ये नमुद असलेले मोजमाप पाहून मी जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जगदाळे यांचा १९९६ चा दस्त माझ्याशिवाय पुर्ण झाला नसता. हे

म्हणणे खरे नाही की, पश्चिम दिशेला असलेल्या बांधकामाचे कब्जा मागणी वादी दस्तगीर यांनी केलेली आहे. मी दावा आणि विनंती कलम वाचले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने केलेल्या विनंतीमध्ये पश्चिम बाजूस असलेल्या बांधकामाचा कब्जा वादीने मागितला आहे आणि नकाशामध्ये 'जे' अक्षराने दर्शविलेल्या क्षेत्राबाबत ताकीद हुकूम मागितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दस्तगीर यांनी १९९६ चा दस्त रद्द करुन मागितलेला आहे.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, आटपाडी न्यायालयात माझ्याविरुद्ध फौजदारी प्रकरण सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, घाणंद येथील येळे वस्तीवर माझे कोणाबरोबर तरी भांडण झाले होते. मला खरसुंडी येथील बाळु जाधव माहिती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाळु जाधव यांच्या मिळकतीच्या उत्तरेकडून जाणारा रस्ता माझ्या मिळकतीकडे जातो. हे म्हणणे खरे नाही की, त्या रस्त्यावरुन माझा आणि बाळु जाधव यांचे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि माझ्या भावामध्ये वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९९६ दस्ताची सगळी माहिती मी पुढाकार घेवून मोहन जगदाळे यांना दस्त करुन दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे क्र. ५८५ मध्ये पाच फुट रस्ता नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात लिहलेले पुर्वाभिमूखी दोन दरवाजे व तीन खिडक्या आहेत हे खोटा व चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये पत्राची इमारत दहा फुट आहे असे खोटे लिहले आहे.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, १९९६ साली अब्दुल हसन संदे हे बेपत्ता होते. हे म्हणणे खरे नाही की, १९९६ पूर्वीपासून अब्दुल संदे यांना भ्रमिष्टपणाचा आजार झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद

क्र. ७ मध्ये नमुद केलेला दक्षिण–उत्तर वीस फुट आणि १–क चे दक्षिण–उत्तर वीस फुट हा मजकूर खोटा व चुकीचा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, १५ x ४० या क्षेत्रफळाची मिळकत मोहन जगदाळे यांना मिळालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दक्षिणेकडील ४.३४ चौ.मी. एवढे क्षेत्र सोडून दस्त झाला असे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, १५ x ४० या क्षेत्रामध्ये मोहन जगदाळे यांची वहिवाट नव्हती. माझ्या शपथपत्रातील पान क्र. ५ मधील 'राजकारणातील पार्टीशनमुळे मोहन जगदाळे यांची नोंद ग्रामपंचायतीस केली गेली नाही' हा मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. १३ मधील 'अब्दुल संदे यांनी खरेदीपत्राबाबत तक्रार केली नव्हती' हा मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकूर वकीलांनी तयार केला व त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मोहन जगदाळे यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही**. श्रवणोत्तर स्वीकृत,

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.02.25 14:58:41 +0530

दिनांक –२५.०२.२०२५. **(आर. बी. कुलकर्णी)**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आटपाडी.